# उन्माद

ना. सी. फडके

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**उन्माद : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ २३०/-

# उन्माद

# शैशव

## १

चिंचेच्या झाडाखाली उभ्या केलेल्या ‘बस’मधल्या आपल्या सीटवरून बापू ड्रायव्हरनं वर मान करून पाहिलं तो सिग्नलचा झेंडा खाली पडलेला त्याला दिसला.

वरच्या स्टेशनवरून गाडी सुटली होती तर आता वीस मिनिटांत ती चिंचवली रोडवर येईल.

बापूनं इतका वेळ काढून ठेवलेला आपला मळकट खाकी कोट घातला. स्टेअरिंग व्हीलवर ठेवलेली आपली खाकी टोपी डोक्यावर चढवली, अन् तो गाडीच्या खाली उतरला. पुण्याहून येणाऱ्या गाडीनं दहा बारा तरी उतारू येतात की नाही असा मनाशी विचार करीत तो स्टेशनच्या छोट्या इमारतीकडे जाऊ लागला. स्टेशनापासून चिंचवली नावाचं तालुक्याचं लहानसं बाहर बारा मैल दूर होतं. चिंचवलीपासून स्टेशनपर्यंत अन् स्टेशनपासून चिंचवलीपर्यंत अशा बसच्या एकंदर चार फेऱ्या बापूला कराव्या लागत. वाटेत दहा-पंधरा खेडी होती, पण तिथे ‘सिटा’ मिळण्याचा संभव फारच कमी असे. शहरांतून किंवा स्टेशनवरून निघायच्या वेळीच दहा पंधरा उतारूंची भरती झाली म्हणजे बापू खुषीत असे. मग ताशी चाळीस वेगानं तो आपली गाडी चालवी, अन् वाटेत खेडवळ लोकांनी दोन्ही हात वर करून कितीही खुणा केल्या तरी तो खुशाल त्यांच्या अंगावरून गाडी पुढे नेई.

स्टेशनजवळच्या हॉटेलच्या मालकानं बापूला पाहून विचारलं, ''काय बापुराव, चहा घेणार काय?''

मनगटावरच्या घड्याळाकडे पाहून बापू रुबाबांत म्हणाला, ''नको. आतां येईलच गाडी.''

''तरी चहा घ्यायपुरता अवकाश आहे हो. या. एक कप स्पेशल करतो तुमच्याकरता.'' असं म्हणून मालकानं आपल्या धोतराच्या सोग्यानं बाक साफ केलं.''

बापूला चहा नको होत असं थोडंच होतं? ''लवकर हं'' असं उगीच वरपांगी म्हणून तो बाकावर बसला.

चहा झाल्यावर सिगारेटही झाली, आणि बापूनं मनांतल्या मनात ओळखलं, की ज्या अर्थी आज आपली इतकी सरबराई चालली आहे त्या अर्थी हॉटेलच्या मालकाची एखादी सीट जवळच्या एखाद्या खेडेगावापर्यंत फुकट नेण्याची कामगिरी आपल्याला करावी लागणार.

त्याचा तो तर्क लगेच खराही ठरला. गाडी आल्याची घंटा झाली म्हणून बापू उठला तेव्हा हॉटेलचा मालक म्हणाला,

''बापुराव, थोडीशी कामगिरी आहे तुमच्याजवळ.''

''असं का? बोला की...''

''आमच्या मावसबहिणीच्या चुलतदिराचा धाकटा लेक काल पुण्याहून आला त्याला इथं वांगेवाडीला...''

''आलं आलं लक्षांत. सोडतो. बसवा त्याला मागच्या बाजूला. बोजा नाही ना फार त्याच्याबरोबर?''

''छे... छे... बापुराव, बोजा कसला? सडं पोरगं जायचं!''

पण ते त्याचं आश्वासन बापूनं धड ऐकलंही नाही. गाडी स्टेशनमध्ये शिरत होती. बापू झटकन् स्टेशनकडे गेला.

तो दाराशी पोचेपर्यंत गाडी येऊन उभी राहिली. दहा वीस माणसं खाली उतरली, आणि लगबगीनं सगळ्यांच्यापुढे आलेल्या एक दोन उतारूंनी बापूला विचारलं,

''काय बापुराव, सीट देता का नाही?''



नेहमीप्रमाणे 'कुठं जायचं?' असा प्रश्न बापू त्यांना करणार होता, पण तितक्यात त्याची दृष्टी प्लॅटफॉर्मकडे गेली व हमालाच्या डोक्यावर बॅग देऊन त्याच्या मागोमाग चालणाऱ्या एका गृहस्थांना पाहताच त्या उतारूंकडे सर्वस्वी दुर्लक्ष करून तो पुढें झाला.

चिंचवलीचे सब्-जज्ज आबासाहेब जोशी दृष्टीस पडल्यावर बापू ड्रायव्हर सामान्य उतारूंशी बोलणार होय?

त्यानं आबासाहेबांना लवून रामराम केला आणि हमालाच्या डोक्यावरची बॅग आपल्या हातांत घेतली.

आबासाहेबांनीं त्याला विचारलं, ''काय बापू, फ्रंट सीट आहे कीं नाहीं?''

''आहे तर!'' असं म्हणून बापू बॅग घेऊन धावला. त्यानं बॅग गाडीत ठेवली, फ्रंट सीट साफ केली आणि गाडीपाशीं जमलेल्या उतारूंना तो म्हणाला,

''हं बसा-बसा लवकर आटपा. साहेबांची खोटी होतां कामा नये.''

स्टेशनांतल्या आणि नंतर स्टेशनाबाहेरच्या लोकांचे सलाम घेत घेत आबासाहेब बसजवळ आले. बापूनं त्यांच्या हातांतली छत्री घेऊन आंत ठेवली, तितक्यांत हॉटेलच्या मालकानं धावत येऊन सब्-जज्जसाहेबांना पिवळ्याधमक ताज्या केळ्यांचे दोन घड दिले तेही आंत व्यवस्थित ठेवलें, अन् साहेब आंत बसल्यावर दार लोटून घेण्याच्या तयारीनं तो उभा राहिला.

आंत चढून बसतां बसतां आबासाहेबांनीं त्याला विचारलं, ''काय बापू, लवकर नेणार ना गाडी?''

''पंधरा मिनिटांत नेतों साहेब! गाडी पांचला यायची ती आज तासभर लेट झाली, नाहीं?''

''होय ना. म्हणूनच म्हणतों तूं आणखी उशीर करूंनकोस.''

''छे... छे...! गाडीत कोण आहे मला कळत नाहीं होय?'' असं म्हणून त्यानं दार बंद केलं, 'बसला ना रे सगळे?' असं अर्धवट धमकीच्या सुरानं इतर उतारूंना विचारलं, आणि मग आपल्या जागीं चढून त्यानं गाडी सुरू केली.

फर्ररदिशीं मोठ्यांदा आवाज करून तोंड वळवून गाडी जी मोठ्या रस्त्याला लागली ती ताशीं पंचेचाळीसच्या वेगानं जाऊं लागली.

आतां आपण साडेसहाच्या बेतानं घरीं जाऊन पोंचूं अशा खात्रीचं समाधान वाटून सब्-जज्जसाहेबांनीं खिशांतील सिगारेट काढून पेटविली, व ते विचार करूं लागले. रविवारच्या सुटीचा फायदा घेऊन ते मुद्दाम पुण्याला गेले होते. बड्या लोकांच्या गांठीभेटी घेऊन वशिल्याच्या खटपटी केल्याशिवाय बढती सहजासहजीं मिळत नाहीं हें त्यांना माहीत होतं. सबज्जच्या जागीं त्यांची नेमणूक झाल्याला आता जवळजवळ सहा वर्षं झालीं होतीं, व डिस्ट्रिक्ट जज्जाची जागा मिळवायची असेल तर आतांपासूनच हातपाय हलवले पाहिजेत हें त्यांनीं ओळखलं होतं. या हेतूनंच ते पुण्याला गेले होते, व आपण ज्यांना भेटलों त्यांच्या सहानुभूतीच्या बोलण्यावरून डिपार्टमेंटमधल्या वरिष्ठांचं आपल्याविषयीं अनुकूल मत आहे यांत शंका नाही असं मनाशीं म्हणत ते परत आले होते. नशिबानं चांगला हात दिला तर कांहीं वर्षांनीं ॲसिस्टंट जज्ज, मग कांहीं वर्षांनीं डिस्ट्रिक्ट जज्ज आणि मग त्यानंतर हायकोर्ट ज्जज- हो हायकोर्ट जज्ज, कां नाहीं? असा विचार त्यांच्या मनांत नेहमींच येत असे. त्यांचा स्वभाव मोठा महत्त्वाकांक्षी होता. नशिबाला उद्योगाची आणि गुणांची जोड लागते हे त्यांना कळत होतं, पण उद्योग आणि गुण दोन्हीही आपल्या अंगीं आहेत याविषयीं त्यांची खात्री होती. त्यांच्यापुढें चाललेले कज्जे ज्या ज्या वेळीं अपील होऊन वरच्या कोर्टात गेले त्या त्या वेळीं त्यांचेच निकाल योग्य ठरविले गेले होते. एकदोनदां तर वरिष्ठ कोर्टानं त्यांच्या निवाड्याचीं विशेष तारीफसुद्धां केली होती. चंदनमल मारवाड्याच्या इस्टेटीचा तो गुंतागुंतीचा खटला... त्याचप्रमाणें भोकरवाडीच्या पाटलाच्या हक्काबद्दलचा तो खटला... आपण वेळोवेळीं दाखविलेली न्यायदानांतील हुशारी... वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नजरेंत थोडीफार तरी भरली असलीच पाहिजे ही गोष्ट त्यांच्या मनांत आली कीं, नोकरींतल्या बढतीच्या वरच्या वरच्या पायऱ्यांकडे दृष्टी लावायला आपल्याला कांहींच हरकत नाहीं असं आबासाहेबांना वाटे. आपण नेहमीं साधे सब्-जज्जच राहणार हे त्यांना कधी संभवनीय वाटत नसे. श्रीनिवास आणि श्यामकांत हे आपले दोघे मुलगे जेव्हां मोठे होतील तेव्हां आपण चिंचवलीसारख्या तालुक्याच्या शहराऐवजी कोणत्या तरी मोठ्या शहरीं विशेष मोठ्या हुद्द्याच्या जागेवर असणार असं गृहीत धरूनच ते आपल्या स्वत:च्या व त्या दोघा मुलांच्या भविष्यकालाविषयी नेहमी विचार करीत. आता बसमधल्या फ्रंट सीटवर बसून प्रवास करतानाही ते तसाच विचार करू लागले.



मुलांचा विचार मनात येताच त्या दोघांसाठी पुण्याहून परत निघताना त्यांनी ज्या वस्तु खरेदी केल्या होत्या त्यांची त्यांना आठवण झाली. त्यांनी बापू ड्रायव्हरला एकदम विचारलं, ''माझी बॅग कुठे ठेवलीस रे?''

''आपल्याला पाय ठेवायला अडचण होईल म्हणून मागच्या बाजूला ठेवली आहे.''

''नीट ठेवली आहेस ना?''

''तर! आपण काळजी करू नका.''

''ठीक!'' घरी जाऊन पोचल्याबरोबर श्रीनिवास व श्यामकांत यांना त्यांच्यासाठी आणलेल्या वस्तू आपण देऊ. श्यामकांत फार खूष होईल. श्रीनिवास होईल की नाही कुणास ठाऊक! त्याला कोणतीही गोष्ट सहसा एकदम पसंत पडत नसे. अन् जरी पडली तरी त्याच्या हातात ती फार वेळ सुखरूप टिकत नसे. त्या दोन जुळ्या मुलांच्या स्वभावातल्या विरोधाचं आबासाहेबांना नेहमीच मोठं कोडं वाटत आलं होतं. श्यामकांत जितका गरीब आणि आज्ञाधारक, तितकाच संतापी असावी, श्यामकांताचं शाळेतल्या अभ्यासाकडे जितकं लक्ष तितकंच श्रीनिवासचं दुर्लक्ष असावं, याचा त्यांना नेहमीच अचंबा वाटे. दोघे मुलगे सध्या आठच वर्षांचे होते खरे, पण त्यांच्या स्वभावातली भिन्नता बालपणीच दिसू लागली ती कमी होण्याऐवजी अधिक स्पष्ट मात्र दिसू लागली होती...

श्यामकांताला आजपर्यंत ज्या ज्या खेळण्याच्या वस्तू मिळाल्या त्या त्या त्यानं आनंदानं स्वीकारल्या होत्या, अन् जपून ठेवल्या होत्या. एका लहानशा कपाटात त्यानं त्या सर्वांचा साठा करून ठेवला होता. विमानं, आगगाड्या, मोटारी, चित्रांचे ठोकळे, अलगुज, स्काउटची शिटी, पत्त्यांचे जोड-किती तरी वस्तू त्या लहानशा कपाटात व्यवस्थित ठेवून दिलेल्या होत्या, अन् साऱ्या जशा काही दोन दिवसांपूर्वीच आणल्या इतक्या सुस्थितीत! शेजारच्या पोरासोराप मिसळणं श्यामकांताला फारसं आवडत नसे, पण घरी आलेल्या पाहुण्यांची किंवा बोलायबसायला आलेल्या मंडळींची लहान मुलं भेटली की कपाट उघडून त्यांना आपल्या सगळ्या वस्तू दाखविण्याची व घटकाभर त्यांच्याबरोबर खेळण्याची त्याला हौस असे. खेळण्याच्या वस्तूप्रमाणेच शाळेतल्या अभ्यासाची व इतर पुस्तकं त्यानं एका पेटीत नीट जपून ठेवली होती. पहिल्या इयत्तेची वाचनपाठमालासुद्धा आजमितीला अगदी जपून ठेवलेली त्या पेटीत सापडली असती...

श्रीनिवासच्या बाबतीत सारंच निराळं! त्याला मिळालेल्या खेळण्याच्या वस्तू घटकाभरदेखील कधी टिकत नव्हत्या. मोटार हातात आली, की ती चालविण्याऐवजी मुद्दाम तिचे भाग सुटे करून आतली रचना पाहण्याचा उद्योग त्यानं करावा. आधी मुळी खेळण्याच्या कोठल्याही वस्तूनं तो एकदम आनंदून जात नसे. त्याला वाटे, अं:, या टीचभर खोट्या विमानाशी काय खेळायचं? खऱ्या विमानाशी खटपट करायला मिळाली पाहिजे. एकदा आबासाहेबांनी त्याला छोटीशी 'एअरगन' आणून दिली. ती घेऊन त्यानं पोपटावर उडविली, पण पोपट मेला नाही. तेव्हा तो वडिलांना म्हणाला, 'मला खरी बंदूक द्यायची असेल तर द्या, असली खोटी बंदूक मला नको', आणि त्यानं ती महादू परटाच्या थोरल्या मुलाला खुशाल देऊन टाकली. अशीच तो आपली सारी खेळणी मोडून टाकी किंवा देऊन टाकी. पुस्तकं तर त्याच्याजवळ कधीच टिकत नसत. यंदा अंकगणिताचं पुस्तक त्यानं दोनदा हरवलं होतं. अन् मग त्याची आची आई संतापली होती...

ती नेहमीच तशी संतापे. श्यामकांताचा गरीब स्वभाव तिला फार सुखाचा होई; अन् श्रीनिवासच्या हूडपणाचा तिला त्रास होई. त्यामुळे दोघेही तिच्याच पोटचे जुळे मुलगे खरे, पण त्या दोघांच्याविषयी भिन्न भिन्न वृत्ती तिच्या ठिकाणी वाढत गेली होती. श्यामकांतावर तिची फार ममता होती; आणि श्रीनिवासवर तिची ममता नव्हती असं कसं म्हणावं, कारण ती त्याची आई होती, पण तिच्या हृदयात खोल कुठं तरी त्याच्याबद्दलच्या रागाची व नापसंतीची छटा होती, ती तिच्या बोलण्याचालण्यात दिसल्यावाचून राहत नसे. त्यानं दांडगाई केली... अन् ती तो पुष्कदाच करी... की त्याला शिक्षा देण्याचा ती प्रयत्न करी. अन् त्या शिक्षेचा त्यानं पुन्हा हूडपणाचा प्रतिकार केला, की मग ती अधिकच संतापे. अशा वेळी ''तू कध्धी कध्धी सुधारणार नाहीस'' असा तिचा ठरीव उद्‍गार असे.

आपल्या पत्नीनं श्रीनिवासच्या तोंडावर असा उद्‍गार काढू नये असं आबासाहेबांना वाटे. असल्या उद्‍गारांनी लहान मुलांच्या मनाला एक प्रकारची 'सूचना'दिल्यासारखं होतं व त्यांच्या मनावर अनिष्ट परिणाम होतो असं त्यांनी एका पुस्तकांत वाचलं होतं, व त्यावर त्यांचा विश्वास होता. बालसंगोपनावरची बरींचशीं पुस्तकं त्यांनीं मध्यें एकदां वाचून काढलीं होतीं. त्यांत सांगितलेल्या तत्त्वांप्रमाणें आपल्या दोन मुलांशीं वागण्याचा त्यांनीं त्या वेळीं संकल्प केला होता, व त्याप्रमाणें



कांही दिवस त्यांनीं प्रयत्नही केला होता. पण पुढें कोर्टांतल्या कामांतच त्यांचा घरचाही वेळ अधिकाधिक लक्ष पुरवावं अशी इच्छा असूनही वेळेच्या अभावीं ती तशीच सोडून देण्याचा प्रसंग सगळ्याच बापावर येत असावा अशी मग ते स्वत:ची समजूत करून घेऊं लागले. वेळेपेक्षां कराराचा अभाव हेंच या गोष्टीचं खरं कारण आहे असं एखादे वेळीं त्यांना वाटे. पण आपल्या अंगीं पुरेसा करार नाहीं असं कबूल करणं त्यांच्या जिवावर येई, व मग वेळेच्या अभावामुळेंच असं घडतं, अन् तें अपरिहार्य असतं अशा विचारानं ते स्वत:चं स्वत:शीं समर्थन करीत.

पण या समर्थनानं श्रीनिवास व श्यामकांत यांच्या स्वभावांतल्या विलक्षण विरोधाबद्दलचं आश्चर्य कांहीं नाहीसं होण्यासारखं नव्हतं. श्रीनिवासचा आजचा तापट, हट्टी व दुराग्रही स्वभाव कधींच सुधारणार नाहीं अशी निराशा व भीती त्यांना जरी वाटत नव्हती तरी तो व श्यामकांत अगदीं भिन्न भिन्न स्वभावाचे निघणार असं त्यांना वाटल्यावांचून राहत नसे; आणि आपल्या दोन जुळ्या मुलांच्या स्वभावांतील या भिन्नतेची संगती कशी लावायची याचं त्यांना नेहमीं कोडं वाटे. आनुवंशिक संस्काराबद्दल विवेचन करणारीं नवीं इंग्रजी पुस्तकं वाचण्याचा विचार त्यांच्या मनांत मधून मधून जोरानं येई. पण चिंचवलीसारख्या गांवाच्या लायब्ररींत अशीं पुस्तकं कुठलीं मिळायला? तीं आपण स्वत:च खरेदी करून वाचलीं पाहजेत असें वाटून त्यांनी मग दोन पुस्तकं मुंबईहून मागवून आणलीं होतीं. पण तीं वाचायला त्यांना अजून वेळ झाला नव्हता. वेळेच्या अभावामुळें त्यांना मान्य करावा लागलेला हा आणखी एक पराभव होता. श्रीनिवासाची कांहीं नवी कागाळी त्यांच्यापर्यंत आली म्हणजे मात्र न वाचतांच शेल्फवर ठेवलेल्या त्या दोन इंग्रजी पुस्तकांकडे ते अपराधी नजरेनं पाहत. पण तें तेवढ्यापुरतंच! एकदोनदां त्यांतलं एक पुस्तक उघडून त्याच्या पहिल्या प्रकरणाचा 'The Delinquent Child' (हट्टी मूल) हा मथळा त्यांनीं पाहिला होता, व ''हें प्रकरण उद्यां नीट वाचलं पाहिजे.'' असं ते मनाशीं म्हणाले होते. पण यापलीकडे त्यांची मजल गेली नव्हती. श्रीनिवासचा हट्टी स्वभाव सुधारण्यासाठी आपण कांहीं प्रयत्न करीत नाहीं हें बरं नव्हे असं एखादे वेळीं फारच तीव्रतेनं त्यांच्या मनात आलं, कीं त्या आरोपांतून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी ते मनाशीं म्हणत, निवळेल त्याचा स्वभाव आपोआपच, वयाबरोबर समज वाढला कीं मुलांचे स्वभाव कुणी कांहीं न शिकवितां सुधारतात....